15 NOV 2017 पुढारी

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

# निवडणुकीसाठी यंत्रणा सज्ज


## ३३ केंद्रांवर होणार मतदान; २२ हजारांहून अधिक मतदार

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

शिवाजी विद्यापीठाच्या १७ नोव्हेंबर रोजी होणाऱ्या निवडणूक मतदानासाठी प्रशासकीय यंत्रणा सज्ज झाली आहे. अधिसभा आणि विविध अधिकार मंडळांच्या १४६ जागांसाठी ही निवडणुक होत आहे.

कोल्हापूर, सांगली व सातारा येथील एकूण ३३ केंद्रांवर ३८ बुथद्वारे मतदान होणार आहे. यासाठी एकूण २२ हजारांहून अधिक मतदार आहेत.

नव्या विद्यापीठ कायद्यानुसार पहिल्यांदाच अधिसभा निवडणुक होत आहे. या निवडणुकीसाठी प्रशासनाने तयारी केली आहे. पदवीधर आणि महाविद्यालयीन शिक्षक गटांत मतदारांची संख्या मोठी असल्याने या गटातील उमेदवारांकडून प्रचारयंत्रणा वेगाने राबवण्यात आली आहे. उर्वरित विभागांतील उमेदवारांनी सोशल मीडियाचा वापर करून मतदारांना संदेश पाठवत प्रचार सुरू ठेवला आहे.



शिवाजी विद्यापीठातून

### कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण

निवडणुकीसाठी नेमणूक करण्यात आलेल्या ११५ कर्मचाऱ्यांसाठी मंगळवारी प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. कार्यशाळेत निवडणूक निर्णय अधिकारी आणि कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, उपकुलसचिव डॉ. व्ही. एन. शिंदे यांनी मार्गदर्शन केले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
लोकमत

# विद्यापीठ अधिसभा निवडणुकांची तयारी पूर्ण

## शिवाजी विद्यापीठ : शुक्रवारी मतदान

लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळासाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी विद्यापीठ प्रशासनाची तयारी पूर्ण झाली असून, या निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी मंगळवारी प्रशिक्षण निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आणि उपकुलसचिव व्ही. एन. शिंदे यांनी घेतले. निवडणूक प्रक्रियेत ११५ कर्मचाऱ्यांचा सहभाग आहे.

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ नुसार विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळाच्या निवडणुकीसाठी शुक्रवारी दि. १७ रोजी मतदान होत आहे. त्यासाठी



विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांत मतदान होणार आहे. तीन जिल्ह्यांत ३३ मतदान केंद्रांवर ३८ बूथद्वारे मतदान होणार आहे. त्यापैकी तीन केंद्रे शहरात असणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी ११५ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. १९ नोव्हेंबर रोजी मतमोजणी होणार आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
पुण्यनगरी

# निवडणुकांसाठी विद्यापीठ प्रशासन तयारी

**कोल्हापूर / प्रतिनिधी :**
शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळासाठी होत असलेल्या निवडणुकीसाठी विद्यापीठ प्रशासनाची जय्यत तयारी सुरू आहे. निवडणूक प्रक्रियेत सहभागी असलेल्या कर्मचाऱ्यांसाठी मंगळवारी प्रशिक्षण पार पडले. त्यामध्ये ११५ कर्मचाऱ्यांनी सहभाग घेतला. विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी शुक्रवार, दि. १७ रोजी मतदान होत आहे. त्यासाठी विद्यापीठ कार्यक्षेत्रातील कोल्हापूर, सांगली आणि सातारा या तीन जिल्ह्यांत मतदान होणार आहे. तीन जिल्ह्यांत ३३ मतदान केंद्रांवर ३८ बुथद्वारे मतदान होणार आहे. त्यापैकी तीन केंद्रे शहरात असणार आहेत. मतदान प्रक्रिया सुरळीत पार पडावी, यासाठी ११५ कर्मचाऱ्यांना प्रशिक्षण देण्यात आले. त्यामध्ये निवडणूक निर्णय अधिकारी तथा कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर आणि उपकुल सचिव व्ही. एन. शिंदे यांनी कर्मचाऱ्यांना मार्गदर्शन केले.


जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
महाराष्ट्र टाईम्स

# मतांचे गणित मांडत प्रचार मोहीम शिगेला

म. टा. प्रतिनिधी, कोल्हापूर

शिवाजी विद्यापीठाच्या अधिसभा व विविध अधिकार मंडळाच्या (सिनेट) निवडणुकीतील प्रचाराचा जोर चांगलाच वाढला आहे. १७ नोव्हेंबर रोजी या निवडणुकीसाठी मतदान होणार असून २० नोव्हेंबर रोजी निकाल जाहीर होणार आहे. मतदानाला अवघे दोन दिवस उरल्याने सर्व गटातील उमेदवारांनी आता मतांचे गणित आखत मोर्चेबांधणी करण्यास सुरूवात केली आहे.

शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी, शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघ यांच्यासह शिवाजी विद्यापीठ विकास मंच, नोंदणीकृत पदवीधर, महाविद्यालयीन शिक्षक, संस्था चालक या गटातील उमेदवारांनी प्रचाराच्या अंतिम टप्प्यात मतदारांची संपर्कयंत्रणा अधिक बळकट केली आहे. शिक्षक (प्राध्यापक) गटातील दहा जागा आणि पदवीधर गटातील नऊ जागांसाठी मोठी चुरस आहे. शिक्षक गटातील दहाही जागा 'सुटा'साठी प्रतिष्ठेच्या आहेत. तसेच अॅकेडमिक कौन्सिल, पदव्युत्तर शिक्षक गटातील निवडणुकीतही आघाडी आणि 'सुटा'मध्ये लढत आहे. तर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडीमध्ये रयत शिक्षण संस्था व विवेकानंद शिक्षण संस्था यांचा समावेश झाल्यामुळे प्रचार मोहीमेने वेग घेतला आहे. ज्या जागा बिनविरोध झालेल्या नाहीत त्यांनी प्रचार यंत्रणेवर अधिक लक्ष केंद्रीत केले आहे.



- मतदारांची दूरध्वनी व प्रत्यक्ष भेटीद्वारे संपर्क
- विद्यार्थी कृतीसमितीचा विद्यार्थ्यांचे प्रश्न सोडवण्यावर प्रचारात भर
- विद्यापीठ विकासाचा विकास आघाडीचा प्रचारातील महत्त्वाचा मुद्दा
- शिक्षकांच्या प्रश्नाबाबत सुटाची प्रचारात आग्रही भूमिका

अॅकेडमिक कौन्सिल, पदव्युत्तर शिक्षक गटातील लढतींवर अधिक लक्ष केंद्रीत करत शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाने (सुटा) प्रचाराची आखणी केली आहे. विद्यापीठाच्या कार्यकक्षेतील शिक्षकांचे प्रश्न सोडवण्यावर सुटाच्या प्रचार यंत्रणेत भर देण्यात आला आहे. तसेच प्रत्येक गटातील सदस्यांच्या स्वतंत्र भेटी घेत प्रचाराची रणधुमाळी उठली आहे.

15 NOV 2017 सकाळ शिवाजी

# विद्यापीठाचा विकास हाच अजेंडा | शैक्षणिक

महाराष्ट्र पब्लिक युनिव्हर्सिटी ॲक्टच्या अंमलबजावणीनंतर विविध अधिकार मंडळांसाठी होणारी ही पहिली निवडणूक आहे.यंदा शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिवाजी विद्यापीठ विकास मंच यांनी एकत्र येऊन निवडणूक लढविण्याचे ठरवले आहे. शिवाजी विद्यापीठाचा विकास करणे, हाच त्यामागील उद्देश आहे. केवळ राष्ट्रीयच नव्हे, तर आंतरराष्ट्रीय स्तरावर विद्यापीठाचा लौकिक वाढविण्यासाठी आम्हाला काम करायचे आहे.

विद्यापीठ विकास मंचच्या झेंड्याखाली एकत्र आलेल्या संघटनांच्या सहकार्यातून विद्यापीठात अधिकाधिक निधी आणण्यासाठी आम्ही प्रयत्नशील आहोत. संस्थाचालक, प्राध्यापक, विद्यार्थी, प्रशासकीय कर्मचारी यांचे प्रश्न मार्गी लावण्याचा आमचा प्रयत्न असेल.




**संजय पाटील**
(अध्यक्ष, विकास आघाडी)

विद्यापीठाला मिळालेल्या 'अ' मानांकनाचा पूरेपुर फायदा करून घेणार तर आहोतच, शिवाय महाविद्यालयातील शैक्षणिक गुणवत्तेवरही आमचे लक्ष असेल. संशोधनाच्या पातळीवर विद्यापीठातील घटक अधिक क्रियाशील होतील, याचीही आम्ही काळजी घेणार आहोत. अधिकार मंडळांच्या निवडणुकीसाठी आम्ही अभ्यासू उमेदवार निवडण्यावर भर देत आलो आहोत. तसा तो यंदाही दिला आहे. विद्यापीठ कायदा, प्राध्यापक, प्राचार्य, संस्थाचालक व विद्यार्थ्यांचे प्रश्न, महाविद्यालयातील शैक्षणिक सोयी-सुविधा यांची पूरेपूर माहिती असणारे हे उमेदवार आहेत.

निवडणुकीतील त्यांच्या विजयाबद्दल आम्ही निश्चिंत आहोत. शिवाजी विद्यापीठ सेवक संघ, अखिल भारतीय विद्यार्थी परिषद (अभाविप), कास्ट्राईब, महाराष्ट्र राज्य महाविद्यालयीन अशासकीय कर्मचारी महासंघ या संघटना आमच्या हातात हात घालून काम करणार आहेत. त्यामुळे विद्यापीठाची प्रतिमा उंचावण्यास हातभार लागणार आहे. प्रतिस्पर्धी सुटातील अंतर्गत अस्वस्थतेची चर्चा होताना दिसत आहे. ते कोणते डावपेच आखणार, त्यांची व्यूहरचना काय असणार, याची आम्हाला चिंता नाही. कारण आम्हाला विजयाची खात्री आहे आणि विद्यापीठाचा विकास हाच आमचा अजेंडा आहे.


## विविध अधिकार मंडळ निवडणूक...



**शिवाजी विद्यापीठाच्या विविध अधिकार मंडळांची निवडणूक शुक्रवारी (ता. १७) होत आहे. त्या पार्श्वभूमीवर शिवाजी विद्यापीठ विकास आघाडी व शिवाजी विद्यापीठ शिक्षक संघाच्या (सुटा) पदाधिकाऱ्यांनी निवडणुकीबाबत व्यक्त केलेले मत..**

नसंपर्क कक्ष
विद्यापीठ, कोल्हापूर

# गुणवत्तेत वाढीचे व्हिजन



डॉ. आर. जी. कोरबू
(सहकार्यवाह,
शिक्षक संघ)

प्राध्यापकांच्या सेवाशर्तींचे संरक्षण करणे, प्राध्यापकांच्या शैक्षणिक गुणवत्तेत वाढ करणे, हा सुटाच्या कार्यामागचा उद्देश आहे. त्याचबरोबर शैक्षणिक क्षेत्रात काही चुकीचे नियम, योजना राबविल्या जात असतील, तर त्याला विरोध करणे, हाही सुटाच्या अजेंड्यावरचा विषय आहे.

यंदाच्या निवडणुकीत हेच मुद्दे घेऊन आम्ही मतदारांसमोर जात आहोत. यंदा सुटाची एकाकी लढत असली, तरी आम्ही कुठेच कमी पडणार नाही, याची दक्षता घेतली आहे. गेल्या निवडणुकीत रयत, स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था आमच्याबरोबर होती. यंदा कदाचित त्यांना आमच्यापासून स्वतंत्र व्हावे, असे वाटले असेल. तो त्यांचा निर्णय आहे. लोकशाही प्रक्रियेत हे होतच असते. त्यामुळे ते आमच्यासमवेत नाहीत, म्हणून फरक पडणार नाही.

सुटाची मध्यवर्ती कार्यकारिणी समिती कोणाला उमेदवारी द्यायची याचा निर्णय घेते. त्यानुसारच उमेदवारी दिली जाते. हा एकट्याचा निर्णय असत नाही. या निवडणुकीत मतदार आमच्याबरोबर आहेत. ते आम्हाला विजयी करतील. कारण विद्यापीठ प्रशासनावर अंकुश ठेवण्याची आमची पद्धत सर्वांना ठाऊक आहे. निवडणुकीसाठी आमचे डावपेच, व्युहरचना अशी काही नाही. आम्ही कोणाला शत्रु मानत नाही. प्राध्यापकांचे हित जोपासणे हेच आमचे कर्तव्य आहे. ज्या ज्या वेळी चुकीचे निर्णय घेतले गेले, त्यावेळी सुटाचे अभ्यासू सदस्यांनी त्याला विरोध केला आहे. हीच परंपरा आम्हाला पुढे न्यायची आहे. दुसरे असे की, लोकशाही प्रक्रियेत प्रत्येकाला निवडणूक लढविण्याचा अधिकार आहे. त्यामुळे बंडखोरी करून कोणी उमेदवारी जाहीर केली असेल, तर तो त्यांचा निर्णय आहे.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
पुढारी

# शिवाजी विद्यापीठास सर्वसाधारण उपविजेतेपद

## १२ स्पर्धा प्रकारांत यश; इंद्रधनुष्य युवा महोत्सव

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

परभणी येथे वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठात दि. ५ ते ९ नोव्हेंबर या कालावधीत आयोजित १५ व्या महाराष्ट्रराज्य आंतरविद्यापीठ युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा एकूण ४० सदस्यांचा संघ सहभागी झाला होता. या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाने एकूण १९ स्पर्धांपैकी १२ स्पर्धा प्रकारांत यश मिळवत इंद्रधनुष्य युवा महोत्सवात पंधरा वर्षांत प्रथमच दुसऱ्या क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपद पटकाविले.

या युवा महोत्सवात शिवाजी विद्यापीठाचा ऋषिकेश देशमाने या विद्यार्थ्यास 'गोल्डन बॉय' म्हणून गौरविण्यात आले. तसेच विद्यापीठाच्या संघाने कातरकाम - प्रथम क्रमांक, मातीकाम - द्वितीय क्रमांक, भित्तीचित्र - प्रथम क्रमांक, लघुनाटिका - प्रथम क्रमांक, वाद्यवृंद - प्रथम क्रमांक, वेस्टर्न ऑर्केस्ट्रा - तृतीय क्रमांक, समूहगीत - तृतीय क्रमांक, सूरवाद्य - प्रथम क्रमांक, तालवाद्य - प्रथम क्रमांक, शास्त्रीय गायन - तृतीय क्रमांक, लोकनृत्य - द्वितीय क्रमांक, मूकनाट्य - द्वितीय क्रमांक, फाईन आर्टस्मध्ये विजेतेपद मिळविले. एकूण स्पर्धेत द्वितीय क्रमांकाचे सर्वसाधारण विजेतेपदाचा मान विद्यापीठाने पटकाविला.

संघास शिवाजी विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे, प्र-कुलगुरू डॉ. डी. टी. शिर्के, कुलसचिव डॉ. व्ही. डी. नांदवडेकर, विद्यार्थी विकास विभागाचे संचालक डॉ. आर. व्ही. गुरव, प्राचार्य डॉ. एस. आर. पाटील आदींचे मार्गदर्शन लाभले.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
लोकमत

# वसंतदादांचे ग्रामीण विकासात मोठे योगदान

## राजा माने : शिवाजी विद्यापीठात चर्चासत्र


लोकमत न्यूज नेटवर्क

**कोल्हापूर :** वसंतदादा पाटील हे एक दूरदृष्टी असणारे नेते होते. त्यांनी व्यापारी, कारखानदार आणि शेतकरी यांना एकत्र आणण्याचे काम केले. त्यामुळे ग्रामीण विकासात वसंतदादांचे मोठे योगदान राहिले आहे, अशा शब्दांत लोकमत सोलापूर आवृत्तीचे संपादक राजा माने यांनी वसंतदादांच्या कार्याचा गौरव केला.

वसंतदादा पाटील यांच्या जन्मशताब्दीनिमित्त शिवाजी विद्यापीठातील राज्यशास्त्र विभाग, गांधी सेंटर आणि यशवंतराव चव्हाण स्कूल रुरल डेव्हलपमेंट यांच्यावतीने आयोजित 'ग्रामीण विकासामध्ये वसंतदादा पाटील यांचे योगदान' या चर्चासत्रात प्रमुख वक्ते म्हणून माने बोलत होते. अध्यक्षस्थानी ज्येष्ठ पत्रकार दशरथ पारेकर होते.

राजा माने म्हणाले, वसंतदादांनी सहकारमहर्षी पद्मश्री विठ्ठलराव विखे-पाटील यांच्या कार्यातून प्रेरणा घेत ग्रामीण विकासाचे काम केले. सांगली परिसरात त्यांनी सहकारातून साखर कारखाना उभारला, तसेच ठिकठिकाणी पाणलोट क्षेत्र निर्माण केले. त्यामुळे या परिसरातील शेतकरी ऊसशेतीकडे वळला. जायकवाडी धरणाचे काम करताना पाटबंधारे खात्याची धुरा वसंतदादांकडे होती. या धरणाच्या पहिल्या टप्प्यातील कामात चार कोटी रुपयांची बचत बांधकाम अधिकाऱ्यांनी केली होती. यामुळे वसंतदादांनी तत्काळ धरणाचे काम करणाऱ्या शिपाईपासून ते अधिकाऱ्यांपर्यंत चार लाख रुपये बक्षीस म्हणून दिले होते. इतका त्यांचा कारभार पारदर्शी होता, असे माने म्हणाले. यावेळी दशरथ पारेकर म्हणाले, वसंतदादा माणूस म्हणून खूप मोठी व्यक्ती होती. सर्वसामान्यांच्या कामासाठी ते कुठलाही प्रोटोकॉल पाळत नसत. जिथल्या तिथे ते काम निपटत असत. यशवंतराव चव्हाण आणि वसंतदादा पाटील यांच्यात तणाव असला तरी एकोपा होता.

चर्चासत्रात प्रा. डॉ. भारती पाटील, प्रा. डॉ. प्रकाश पवार यांनीही वसंतदादांच्या व्यक्तिमत्त्वाचे विविध पैलू उलगडले. चर्चासत्राचे आयोजन प्रा. गजानन साळुंखे, प्रा. वैशाली भोसले यांनी केले होते.



### उचित स्मारकाची खंत

वसंतदादांनी राज्यासाठी मोठे योगदान दिले असले तरी, राज्य सरकारने त्यांच्या कार्याला शोभेल असे उचित स्मारक उभारले नसल्याची खंतही राजा माने यांनी यावेळी व्यक्त केली.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
15 NOV 2017
पुढारी

# विद्यापीठात इराण-इराकमधील भूकंपाची नोंद

**कोल्हापूर : प्रतिनिधी**

इराण-इराकमध्ये झालेल्या भूकंपाची नोंद शिवाजी विद्यापीठातील पदार्थविज्ञान विभागाच्या सिस्मोग्राफवर झाली आहे. या भूकंपासंदर्भातील सुक्ष्म माहितीची नोंद विद्यापीठातील या उपकरणांवर झाली आहे. याबाबतच्या माहितीचे विश्लेषण डॉ. ए. के. शर्मा करत आहेत.